**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ३१ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **संतोष देशमुख हत्या प्रकरणात सीआयडीला स्वायत्तता; याप्रकरणातील एकही आरोपी सुटणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.**
2. **सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी करण्यास ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय- राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांची घोषणा.**
3. **गडचिरोली जिल्हयाला आकांक्षित जिल्हयांच्या यादीतून बाहेर काढण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज -केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ.**
4. **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी 2.0 च्या प्रकल्पास अधिक गती देण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश.**

**संतोष देशमुख हत्या प्रकरण**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना शिक्षा करुन संतोष देशमुख याना न्याय मिळवून देण्याचा आमचा उद्देश आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. वाल्मिक कराड यांनी पुणे येथे सीआयडी मुख्यालयात शरणागती पत्करली. त्यानंतर फडणवीस माध्यमांशी बोलत होते..

***बीडच्या प्रकरणामध्ये कुणालाही आम्ही सोडणार नाही. ज्याचा ज्याचा संबंध आढळेल ज्या-ज्या प्रकरणात आढळेल. त्या प्रत्येकावर याठिकाणी कारवाई करण्यात येईल. गुंडांचे राज्य आम्ही चालू देणार नाही. जाणीवपूर्ण हि केस सी.आय.डी ला देण्यात आलेली आहे त्यांना पूर्ण स्वायत्तता देण्यात आलेलं आहे, कुणाचाही त्यांच्यावर दबाव चालवून घेतला जाणार नाही कुठलाही दबाव राहणार नाही.***

या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचा सहभाग आहे का, असा प्रश्न माध्यमांनी विचारले असता, मला राजकारणात जायचे नाही. कोणाकडे पुरावे असेल तर द्यावे, असे मुख्यमंत्र्यानी स्पष्ट केले. तसेच, काही लोकांना राजकारण हवे आहे. त्यांचे राजकारण त्यांना लखलाभ असो. त्यांनी राजकारण करत राहावे. आमची भूमिका स्पष्ट आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांना न्याय मिळवून द्यायचा आहे आणि तो आम्ही मिळवून देऊ, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

**संतोष देशमुख हत्या**

बीड जिल्हयातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा आरोप असलेले वाल्मिक कराड हे पुणे इथं सीआयडी कार्यालयात पोलिसांना शरण आले आहेत. तत्पूर्वी

त्यांनी स्वतःचा एक व्हिडीओ प्रसिद्ध करून त्यात स्वतःवरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. राजकीय द्वेषापोटी आपल्याविरोधात आरोप केले जात असून, पोलिस तपासात दोषी आढळल्यास जी शिक्षा होईल, ती भोगण्यासाठी तयार असल्याचं ते म्हणाले.

**सोयाबीन मुदतवाढ**

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी करण्यास दिनांक ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केली. पणन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंत्री जयकुमार रावल यांनी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. रावल म्हणाले की, राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी, लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत सात दिवसांनी म्हणजेच ६ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वीच्या निर्णयानुसार ही मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. आता सोयाबीनच्या खरेदीसाठी ६ जानेवारीपर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे. तसेच नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि एनसीसीएफ (NCCF) यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे, अशी महिती देखील मंत्री  रावल यांनी दिली. किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीनची खरेदी ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल या हमीभावाने सुरू आहे. आतापर्यंत सोयाबीनची तीन लाख ३४ हजार ३३१ मेट्रिक टन एव्हढी विक्रमी खरेदी झाली आहे. यावर्षी शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपये मोबदला देण्यात आला आहे.

**कोरेगांव भीमा**

कोरेगांव भीमा इथं उद्या होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमासाठी पाच हजार पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे एक हजार जवान आणि ७५० पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कोरेगाव भिमा परिसरात ४५ ठिकाणी वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली आहे. ३०० सीसीटीव्ही,  दहा ड्रोन, आणि ५० पोलीस टॉवरद्वारे परिसरात देखरेख ठेवली जाईल. चोरीच्या घटना रोखण्यासाठी विशेष पोलीस पथकही तैनात असेल असं अमितेश कुमार यांनी सांगितलं. पुणे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी यासंदर्भात केलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली.

***यावर्षी साधारणपणे ३१ डिसेंबर च्या रात्री पाउने ६०० बसेस आपण त्यासाठी  वापरत आहोत आणि दुसऱ्या दिवशी साधारणपणे ११०० बसेस हे त्या पूर्ण रूट वर  धावतील आणि येणाऱ्या अनुयायानसाठी आल्यानंतर पार्किंग त्याठिकाणी जवळपास ४५ ठिकाणी पार्किंग ची व्यवस्था केलेली आहे. याठिकाणी २८० एकर एवढी जागा आपल्या पार्किंग साठी व्यापलेली आहे साधारणपणे २४०० टॉयलेटस तात्पुरत्या स्वरूप मध्ये बसवत आहोत आणि पुढे १९० टँकरनी या सर्व अनुयायांना पिण्याचे पाणी देता येईल.***

***साधारणपणे २३ ओ.पी.डी. इथे चालू असतील, ४३ रुग्णवाहिका त्याठिकाणी आपण ठेवलेले आहेत.***

दरम्यान, विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायींना तिथल्या सुविधांची माहिती मिळावी यासाठी जिल्हा परिषदेनं 'विजयस्तंभ सुविधा' ॲप तयार केलं आहे. या ॲपचा उपयोग करुन अनुयायांना शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांपर्यंत सहजपणे पोहोचता येणार असल्याचं, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी सांगितलं.

**नववर्ष तयारी**

आज ३१ डिसेंबर, सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचं स्वागत करण्याचा दिवस आहे. नव्या वर्षाचं उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यासाठी नागरिक उत्सुक असून, विविध पर्यटन स्थळ, हॉटेल्स नागरिकांनी फुलून गेली आहेत. मद्य किंवा अंमली पदार्थांचं सेवन करुन वाहन चालवणाऱ्यां विरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचं, नागपूरचे पोलिस आयुक्त रवींद्र सिंघल यांनी कळवलं आहे.याशिवाय पोलीस विभागातर्फे केलेल्या तयारी बद्दल त्यांनी सांगितले....

***(झिरो टॉलरन्स धोरण आहे त्याच्यात आम्ही लिहिलेलं आहे कि, झिरो फँटलीटी झिरो स्टेबिन्ग आणि झिरो इन्ज्युरी असा आपला एक मोटो आपण ठेवलेला आहे आणि हेतू एक हेच आहे की कुणालाही कुठलाही प्रकारची इजा होऊ नये ऍक्सिडेंट वगैरे होऊ नये आणि दारू पिऊन कुणीही गाडी वगैरे चालू नये, तसेच आपण नोटीस पण देत आहे रेस्टोरेंट, बार वगैरेला कि आतमध्ये कोणती भांडण झाली दारू पिऊन तर त्याच्याबद्दल आम्हाला माहिती देणे कुणी जर दारू पिऊन गाडी चालवत आहे, तुमच्याकडून पिऊन बाहेर निघतोय तर त्याची माहिती आह्माला दिली पाहिजे तसेच कुणीही विदाऊट दारू परमिट दारू घेऊ नये हे इंस्ट्रकशन्स बार आणि रेस्टोरेंटला देतो आहे.)***

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी हा महाराष्ट्र शासनाचा फ्लॅगशीप कार्यक्रम आहे. या प्रकल्पाच काम वेगान सुरू असून काम करत असतांना प्रकल्प विकासकांना ज्या ठिकाणी अडीअडचणी येत असतील, तर संबंधित जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी नियमित आढावा बैठक घेऊन त्या समस्या सोडवाव्यात. यासंदर्भातील अहवाल पुढील 15 दिवसामध्ये मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी 2.0 ची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, तसेच या प्रकल्पाचे

विकासक उपस्थित होते. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प राबवितांना प्रकल्प विकासकांना आता ग्रामपंचायतीकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याने नमुद करून मुख्यमंत्री म्हणाले की, जमीन अतिक्रमीत झालेल्या ठिकाणी प्रकल्प विकासक तसेच जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित बैठक घ्यावी. त्याचप्रमाणे विकासकांना येणाऱ्या अतिक्रमीत जमिनीसंदर्भात समस्या सोडविण्यासाठी पोलीस अधीक्षक यांना जबाबदारी देण्यात यावी.
केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ गडचिरोली दौरा

गडचिरोली जिल्ह्याला आकांक्षित जिल्ह्यांच्या यादीतून बाहेर काढण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांची आणि तत्परतेने काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी केले. आकांक्षित जिल्ह्याचा आढावा घेण्यासाठी केंद्र शासनातर्फे संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ गडचिरोली जिल्ह्याच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आले आहेत. त्यांनी काल विविध शासकीय विभागाच्या प्रमुखांचा जिल्हा नियोजन भवन येथे आढावा घेतला. गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अविशांत पांडा, खासदार डॉ.नामदेव किरसान,आमदार रामदास मसराम, आमदार डॉ.मिलिंद नरोटे, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. राज्यमंत्री संजय सेठ यांनी शिक्षणावर भर देताना जिल्ह्यातील शाळांची संख्या, विद्यार्थ्यांची उपस्थिती, मध्यान्ह भोजन योजना यावर माहिती जाणून घेतली. जिल्ह्यात केंद्रीय विद्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. आरोग्य यंत्रणा, प्रमुख पिके कोणती, नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदतीची सुविधा, किसान क्रेडिट कार्ड आणि किसान सन्मान योजनेच्या लाभार्थींची संख्या, सिंचन याविषयी माहिती जाणून घेतली.यानंतर संजय सेठ यांनी गोंडवाना विद्यापीठाचे प्रशिक्षण केंद्र व एकल सेंटरला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिवाय कोटकल ग्रामपंचायतीला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. दरम्यान, आज सेठ यांनी मार्कंडादेव मंदिर समूहाला भेट देऊन तेथील विकास कामांची माहिती घेतली.

**हवामान**

विदर्भात आज सर्वात कमी, किमान तापमान गोंदिया जिल्ह्यात तेरा पूर्णांक पाच इतकं नोंदवण्यात आलं. गोंदियाच्या पाठोपाठ भंडारा इथे पंधरा पूर्णांक सहा तर नागपुर इथं 16.4 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. अमरावती इथे 16. 8 तर वर्धा इथे 17.4 इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान 17 अंश ते अठरा अंश सेल्सियस दरम्यान आहे. आज चंद्रपूर इथे सर्वाधिक कमाल तापमान 31 अंश सेल्सिअस इतक नोंदवण्यात आलं. आगामी काही दिवस हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवला आहे.

*****